




सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १६८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ८ ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४








# आमचा तुमच्यावर विश्वास, देशाला तुमची गरज

## जंतर-मंतरवरील CJP च्या आंदोलनानंतर पंतप्रधान मोदींचं विद्यार्थ्यांना आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नवी दिल्ली**

नीट पेपरफुटीविरोधात कॉक्रोच जनता पार्टीने जंतरमंतर येथे तीव्र आंदोलन केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधातील रोष वाढला होता. या घटनेनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज पहिल्यांदा जाहीर भाषण केलं. यावेळी त्यांनी तरुण पिढीच्या क्षमता आणि सामर्थ्यावर विश्वास व्यक्त केला. नवी दिल्लीतील नामांकित भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या (खखढ) वार्षिक पदवीदान समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी बोलत होते.



आमचा तुमच्यावर विश्वास आहे. देशाला तुमची गरज आहे, असं पंतप्रधान मोदी म्हणाले. प्रत्येक पिढीची राष्ट्रीय जबाबदारी असते, असं सांगून तरुणांच्या उद्दिष्टांमध्ये देशाचा सर्वांगीण विकास समाविष्ट असला पाहिजे, असं त्यांनी सुचवलं. तुम्हा सर्वांना माहीत आहे की प्रत्येक पिढीला त्यांच्या काळातील विशिष्ट आव्हानांना सामोरं जावं लागतं आणि त्यांची स्वतःची राष्ट्रीय जबाबदारीही असते. तुमच्या आयुष्यातील पुढील ३० ते ३५ वर्षांत तुम्ही जे काही कराल, त्याचा परिणाम आमच्या 'विकसित भारत'च्या प्रवासावर होईल. त्यामुळे, तुम्ही घेतलेल्या प्रत्येक निर्णयाचा आधार हाच असावा, याचा देशाला कसा फायदा होईल? याद्वारे देशाची कोणती गरज पूर्ण होईल? असं ते म्हणाले.

आजच्या वेगाने बदलणाऱ्या जगात तंत्रज्ञान अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं पंतप्रधान मोदींनी सांगितलं. जे या बदलांशी जुळवून घेतील तेच अखेर जिंकतील, असं त्यांनी सुचवलं. जागतिक धोरणात्मक समीकरणे वेगाने बदलत आहेत. तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या वेगामुळे जागतिक सत्तेचा समतोल प्रत्येक क्षणाला बदलत आहे. पुढील २० किंवा ३० वर्षांत जग कसं दिसेल हे कोणीही खात्रीने सांगू शकत नाही. जग, तंत्रज्ञान, उद्योग आणि व्यवसाय सर्वच बदलतील. पण या सगळ्यात एक गोष्ट लक्षात ठेवा, जे शिकत राहतील तेच यशस्वी होतील, असं ते म्हणाले.

### नवी क्षेत्रे खुली करण्यात आली

स्कायरूटच्या 'विक्रम-१' रॉकेटच्या यशस्वी प्रक्षेपणाचा उल्लेख करत पंतप्रधानांनी अधोरेखित केलं की, सरकारने तरुणांना त्यांचं योगदान देण्यासाठी विविध मार्ग खुले केले आहेत. आम्ही अनेक मार्ग खुले केले आहेत ज्याद्वारे आमचे तरुण योगदान देऊ शकतात. नवीन क्षेत्रे खुली करण्यात आली आहेत. मी यापूर्वी अंतराळ क्षेत्राबद्दल बोललो होतो. आज तेच अंतराळ क्षेत्र आमच्या तरुणांसाठी आकाश बनले आहे, असं ते म्हणाले. आपल्या भाषणाला 'जेन झी' (ऋश्वप न) चा स्पर्श देत पंतप्रधान मोदी म्हणाले, आज आमचा तरुण म्हणत आहे, 'माझ्या घराण्यात रॉकेट बनवणारा मी पहिलाच'. आज आमचा तरुण रॉकेट लॉन्च करत आहे. आमचे ड्रोन क्षेत्रही विस्तारत आहे. राष्ट्रीय सुरक्षेत आणि औषधांच्या वाहतुकीसाठी ड्रोनचा वापर केला जात आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

# 'भिऊ नका मी तुमच्या पाठिशी आहे'

## मोदींच्या त्या विधानावरून उद्धव ठाकरेंची टीका म्हणाले

# 'ही धमकी नेमकी कुणाला?'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८मुंबई** तरुणांना भेटण्यासाठी पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्र्यांना वेळ नाही. पण जे गद्दार आहेत, शिवसेना चोरून शाहसेना ज्यांनी स्थापन केली. त्या गद्दारांना भेटायला पंतप्रधानांना वेळ आहे. पंतप्रधान मोदी या खासदारांना फक्त भेटलेच नाही तर त्यांनी 'भिऊ नका मी तुमच्या पाठिशी आहे', असे वचनही गद्दारांना दिले, अशी संतप्त प्रतिक्रिया शिवसेनेचे (ठाकरे) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिली. मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी पंतप्रधान मोदी आणि बंडखोर खासदारांच्या भेटीवर टीका केली.



विद्यार्थी आंदोलनाचा हवाला देताना ते म्हणाले, गेल्या दोन महिन्यांपासून जगभरात भारतातील जेन-झी पिढीने सरकारला कसे गुडघ्यावर आणले याची चर्चा सुरू आहे. मला एका गोष्टीचे वैशम्य वाटते की, या पिढीला आधार देण्याऐवजी त्यांच्यावर निर्घृण अत्याचार केले गेले. काही जणांना तर जालियानवाला बाग हत्याकांडाची आठवण या निमित्ताने झाली. विद्यार्थ्यांचा छळ केल्यानंतर पंतप्रधान मोदी त्यांच्याशी बोलायला तयार नाहीत. गृहमंत्र्यांचीही बोलण्याची हिंमत नाही. आज संपूर्ण देश पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांकडून उत्तर मागत आहे. एका मंत्र्यांचा राजीनामा घेऊन हे थांबणार नाही, आता संपूर्ण व्यवस्था म्हणजेच सरकार बदलावे लागणार आहे.

विद्यार्थी आंदोलकांवर अत्याचार केले. त्यांच्यावर लाठ्या चालवल्या, त्यांना भेटण्यासाठी पंतप्रधान मोदींकडे वेळ नाही. पण गद्दारांना भेटून मी तुमच्या पाठिशी आहे, असे आश्वासन पंतप्रधान देत आहेत. खरेतर हे वाक्य त्यांनी आंदोलक तरुणांना बोलायला हवे होते, अशीही टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, अमित शाह मुंबईत असताना शिंदे सेनेच्या खासदारांनी पंतप्रधान मोदींची भेट घेतली. तसेच भिऊ नका, मी तुमच्या पाठिशी आहे, असेही म्हटले. पंतप्रधानांचा हा धमकीवजा संदेश कुणासाठी आहे? हा संदेश त्यांनी सर्वोच्च न्यायालय, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिला आहे?

पंतप्रधान मोदी यांनी शिंदे सेनेच्या खासदारांना जे म्हटले, त्याच्या बातम्या देशभरातील वृत्तपत्रात छापून आल्या आहेत. या सर्व बातम्या आम्ही सर्वोच्च न्यायालयातही सादर करू. ही लढाई आता केवळ शिवसेनेपुरती मर्यादीत राहिली नाही. गद्दारीचा व्हायरस संपूर्ण देशात पसरला आहे. पंतप्रधान मोदींनी हा संदेश भविष्यात फुटल्या जाणाऱ्या पक्षातील नेत्यांनाही दिला आहे का? तुम्ही आमच्याबरोबर या तुमचे काहीही वाकडे होणार नाही, हा संदेश त्यांनी दिला आहे का? असाही प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला.

# बांबूच्या शेतीत विदर्भाचा डंका!

# यवतमाळ राज्यात नंबर १

## ९ हजारांहून अधिक शेतकरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८यवतमाळ**

पर्यावरणातील कार्बन डायऑक्साइड



मोठ्या प्रमाणात शोषून ऑक्सिजन उत्सर्जित करणाऱ्या बांबूच्या लागवडीत महाराष्ट्रात विदर्भाने अव्वल स्थान निर्माण केले असून बांबू लागवडीत यवतमाळ हा पहिल्या क्रमांकावरील जिल्हा ठरला आहे. तर अमरावती, वाशिम, अकोला अन् बुलढाण्याचा देखील टॉप टेनमध्ये समावेश झाला आहे. बांबू लागवडीमुळे पर्यावरणाचे संवर्धन होऊन शेतकऱ्यांनाही भरघोस उत्पन्न मिळत असल्यामुळे विदर्भातील शेतकरी बांबूच्या शेतीकडे मोठ्या प्रमाणात वळत असल्याचे यावरून स्पष्ट झाले आहे.

महाराष्ट्रात बांबू लागवडीला चालना देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांना विदर्भातून सर्वाधिक प्रतिसाद मिळत आहे. राष्ट्रीय बांबू अभियान आणि अटल बांबू समृद्धी योजनेंतर्गत लाभार्थी आणि लागवड क्षेत्र या दोन्ही बाबतीत विदर्भातील अनेक जिल्हे राज्यात आघाडीवर आहेत.

महाराष्ट्र बांबू विकास मंडळाच्या आकडेवारीनुसार, यवतमाळ, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा या जिल्ह्यांनी बांबू लागवडीत उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. राष्ट्रीय बांबू अभियानांतर्गत यवतमाळ जिल्ह्यात सर्वाधिक ९,०३० शेतकऱ्यांनी ३२,३३४.३५ एकरमध्ये बांबूची लागवड केली आहे. दुसऱ्या क्रमांकावर पालघर, तिसऱ्या क्रमांकावर जालना,

### बांबू लागवडीची जून २०२६मधील राज्याची स्थिती

| जिल्हा | शेतकरी | एकर |
|---|---|---|
| यवतमाळ | ९,०३० | ३२,३३४.३५ |
| पालघर | ३,८०१ | १६,२५३.०९ |
| जालना | ३,३३६ | १०,२४९.७७ |
| अमरावती | ३,१७५ | १०,२३६.१८ |
| परभणी | २,९२४ | ९,६०८.११ |
| वाशिम | १,५१३ | ४,७६६.९६ |
| नंदुरबार | ८६४ | ३,६९५.५२ |
| अकोला | १,११५ | ३,६७४.०० |
| बुलढाणा | ८७० | २,७३६.२९ |
| नांदेड | ८५७ | २,४३५.१६ |

चौथ्या क्रमांकावर अमरावती, पाचव्या क्रमांकावर परभणी, सहाव्या क्रमांकावर वाशिम, सातव्या क्रमांकावर नंदुरबार, आठव्या क्रमांकावर अकोला, नवव्या क्रमांकावर बुलढाणा आणि दहाव्या क्रमांकावर नांदेडचा समावेश आहे.

बांबू लागवडीमुळे शेतकऱ्यांना उत्पन्नाचे पर्यायी साधन उपलब्ध होत असून पर्यावरण संरक्षणालाही हातभार लागत आहे. राज्य सरकार शेतकऱ्यांना ७१ऋड प्रोत्साहन देण्यासाठी अनुदान, तांत्रिक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण उपलब्ध करून देत आहे. मात्र, बांबू प्रक्रिया उद्योग, फर्निचर निर्मिती, बायोमास प्रकल्प आणि बाजारपेठेची साखळी अधिक मजबूत केल्यास या क्षेत्राचा दीर्घकालीन विकास होऊ शकत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

एकूणच, राज्यातील बांबू अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू म्हणून विदर्भ उदयास येत असून बांबूची लागवड करून विदर्भातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध होत असल्याची स्थिती आहे.

# केंद्राची बंदी, तरी शेतकऱ्यांची पसंती!

## देशात एचटीबीटी कापसाचा वाढता बोलबाला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती-** केंद्र सरकारने बंदी घातली असली तरी देशात कापसाच्या एचटीबीटी बियाण्यांचा वापर वाढत आहे. चालू व मागील तीन हंगामात या बियाण्यांचा बाजारातील वाटा ३० ते ३७टक्के तर अधिकृत बीजी-२ या कापूस बियाण्यांचा सेल बँक ३५ ते ७० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. सेल बँकचा सर्वाधिक फटका छोट्या बियाणे उत्पादक कंपन्यांना बसला असून, त्यांचा सेल बँक ६५ ते ७० टक्के तर मोठ्या कंपन्यांचा २० ते २५ टक्के आहे.

देशभरातील १० कापूस उत्पादक राज्यांमध्ये दरवर्षी सरासरी ५ ते ५.५ कोटी पाकिटे (प्रति पाकीट ४५० ग्रॅम बियाणे) बियाण्यांची आवश्यकता असते. या सर्वाधिक बियाण्यांचा म्हणजेच १.५ ते १.६ कोटी पाकिटांचा वापर व मागणी महाराष्ट्रात आहे. देशात सर्वाधिक २७ ते २८ लाख पाकिटांचा वापर एकट्या यवतमाळ जिल्ह्यात केला जात असून, २२ ते २४ लाख पाकिटे जळगाव जिल्ह्यात व तेवढीच मध्य प्रदेशात वापरली जातात. सन २००८ पासून एचटीबीटी कापूस बियाण्यांच्या उत्पादनाला गुजरातमधून सुरुवात झाली. एकूण उत्पादनाच्या ७० टक्के एचटीबीटी बियाणे खुले तर



३० टक्के बियाणे पॅकिंग करून विकले जाते. खुल्या बियाण्यांच्या विक्रीवर बंदी नाही. ते बियाणे पॅकिंग करून बाजारात आणल्यास त्याला नियम व कायदे लागू होतात. यावर्षी महाराष्ट्रात एचटीबीटी बियाण्यांचे ४५ ते ५५ लाख पाकिटे विकली गेली आहेत. मजुरांची कमतरता व निंदण खर्च कमी करण्यासाठी शेतकरी तणनाशक सहनशील असलेल्या एचटीबीटी बियाण्यांना पसंती दर्शवित असले तरी केंद्र सरकारने अधिकृत परवानगी न दिल्याने या बियाण्यांची गुणवत्ता व शुद्धतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### एचटीबीटीचा अंदाजे वापर

विदर्भ २० ते २२ लाख पाकिटे -३५ ते ८५ टक्के

खानदेश - १५ ते १८ लाख पाकिटे -३० ते ३५ टक्के


मराठवाडा - १० ते १२ लाख पाकिटे -२० ते २५ टक्के

पश्चिम महाराष्ट्र - १ ते २ लाख पाकिटे -४ ते ५ टक्के

# विश्वगुरु होण्यासाठी केवळ सरकारच नव्हे ,तर संपूर्ण समाजाने पुढे यावे

## - सरसंघचालक डॉ. मोहन भागवत

### खामगाव येथील सर्वोदय पारधी समाज आश्रमशाळा क्रीडा संकुलचे उदघाटन



**दि.८ खामगाव :** भारत विश्वगुरू व्हावा, अशी इच्छा प्रत्येकाच्या मनात आहे. मात्र देशाला ही उंची गाठायची असेल तर समाजातील प्रत्येक घटक समान भावनेने जोडला गेला पाहिजे, सर्व समाज 'सारखा' झाला पाहिजे. हे समाजाने करायचे काम आहे. केवळ सरकारवर सोडून चालणार नाही. सरकार जे करायचे ते करेल पण ही आपली सर्वांची जबाबदारी आहे, असे अर्थपूर्ण प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

शुक्रवारपासून बुलढाणा दौऱ्यावर असलेले डॉ. भागवत यांच्या हस्ते खामगाव येथील सर्वोदय पारधी समाज आश्रमशाळेच्या १० हजार चौरस फुटाच्या बंदिस्त सभागृह आणि क्रीडा संकुलचे आज उदघाटन करण्यात आले. या कार्यक्रमास आदिवासी मंत्री अशोक उईके, कामगार मंत्री आकाश फुंडकर, अमानोरा फॉउंडेशनचे अनिरुद्ध देशपांडे, डॉक्टर आयुषी देशमुख उपस्थित होते.

यावेळी भागवत म्हणाले, आपलेपणाची भावना निर्माण झाली तर भटक्या-विमुक्त समाजाचा उत्कर्ष दूर नाही. ही जबाबदारी केवळ सरकारची नाही,आपल्या सर्वांची आहे. हा समाज परका नाही, आपलाच आहे. आजच्या समाज रचनेत आपल्याच समाजाचे घटक मागे पडले, कारण परिचय राहिला नाही, आपलेपणा राहिला नाही.

भटक्या-विमुक्त समाजाच्या उत्कर्षात आपला उत्कर्ष आहे. ही जबाबदारी आपली आहे , केवळ सरकारची नाही या शब्दांत भागवत यांनी भटक्या-विमुक्त समाजाच्या आजच्या अवस्थेचे मूळ अधोरेखित केले. भटक्या-विमुक्त समाजाकडे दयेने नव्हे, तर आपलेपणाच्या भावनेतून पाहण्याची गरज आहे, असा स्पष्ट संदेश त्यांनी खामगावातून दिला.

परिस्थितीमागील सामाजिक कारणांवर भाष्य केले. परकीय आक्रमणे आणि पारतंत्र्याच्या काळात समाजातील अनेक घटक मुख्य प्रवाहापासून तुटले. कालांतराने आपल्याच समाजातील या घटकांशी एकमेकांचा परिचय आणि आपलेपणाची भावना कमी होत गेली. त्यातून एक मोठी सामाजिक दरी निर्माण झाली.आपल्या समाजात आपल्याच समाजाचे घटक मागे पडले. कारण परिचय नाही, आपलेपणा नाही. तोच हा घुमंतू समाज आहे, असे डॉ. भागवत म्हणाले.

# शालेय बसच्या चाकाखाली चिमुकलीचा दुर्दैवी अंत

## रिद्धपूरमध्ये हळहळ बस मधून उतरताना चालकाचे दुर्लक्ष ठरले जीवघेणे ;७ वर्षीय ईश्वरीचा जागीच मृत्यू,शालेय बसच्या सुरक्षेचे नियम कागदावरच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८चांदूर बाजार-** चांदूर बाजार शहरापासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या रिद्धपूर येथील बाजार चौकात शनिवारी सकाळी शालेय बसमधून उतरत असताना एका सात वर्षीय चिमुकल्या विद्यार्थिनीचा बसच्या चाकाखाली येऊन जागीच दुर्दैवी मृत्यू झाला या हृदयद्रावक घटनेने रिद्धपूरसह चांदूर बाजार परिसरात एकच खळबळ उडाली असून पालकांमध्ये शालेय बसच्या सुरक्षेबाबत तीव्र चिंता निर्माण झाली आहे मृत विद्यार्थिनीचे नाव ईश्वरी ठाकरे असून ती चांदूर बाजार येथील आनंद प्रायमरी स्कूलमध्ये शिक्षण घेत होती शनिवारी सकाळची शाळा संपल्यानंतर ईश्वरी शालेय बसने रिद्धपूर येथील आपल्या घरी जात होती बस रिद्धपूरच्या बाजार चौकात पोहोचल्यानंतर ती बसमधून खाली उतरत असताना ही दुर्दैवी घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे मिळालेल्या माहितीनुसार ईश्वरी बसमधून उतरत असताना चालकाने पुरेशी खबरदारी न घेतल्याने ती बसच्या चाकाखाली आली या भीषण अपघातात तिचा जागीच मृत्यू झाला अवघ्या सात



वर्षांच्या चिमुकलीचा अशा प्रकारे दुर्दैवी अंत झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे

घटनेनंतर बस चालकाने मृत ईश्वरीला चांदूर बाजार येथील उपजिल्हा रुग्णालयात आणले त्यानंतर चालक स्वतः पोलिसांच्या ताब्यात गेल्याची माहिती आहे घटनेची माहिती मिळताच ईश्वरीच्या नातेवाईकांनी उपजिल्हा रुग्णालयात मोठी गर्दी केली होती परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनीही रुग्णालय परिसरात मोठा बंदोबस्त तैनात केला या घटनेनंतर शालेय बसच्या विद्यार्थी बसमधून उतरताना त्यांना सुरक्षितपणे खाली उतरवणे, बसपासून दूर होईपर्यंत त्यांच्यावर लक्ष ठेवणे आणि बस सुरू करण्यापूर्वी परिसर सुरक्षित असल्याची खात्री करणे ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे मात्र जर बसमध्ये आवश्यक सेवकच उपस्थित नसेल तर लहान विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी नेमकी कोणाची असा सवाल आता पालकांकडून उपस्थित केला जात आहे ईश्वरीच्या मृत्यूने केवळ एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला नाही तर शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आणला आहे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवताना त्यांची सुरक्षितता शाळा आणि शालेय बस व्यवस्थापनाच्या हातात सोपवतात अशावेळी एका छोट्याशा दुर्लक्षामुळे एखाद्या कुटुंबाचा आधार हिरावला जाणे ही अत्यंत गंभीर बाब आहे या घटनेप्रकरणी चालक अक्षय खुळसुंगे, रा. पोरगव्हाण याला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती आहे शिरखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळाली आहे पोलिस तपासानंतर या घटनेमागील नेमकी कारणे आणि जबाबदारी स्पष्ट होणार आहे.

### शालेय बसच्या कागदपत्र नाही; आर्थिक हातमिळवनुकीची चर्चा

मिळालेल्या माहितीनुसार एमएच-२७-ए-९७६३ क्रमांकाच्या शालेय बसची कागदपत्रे पूर्ण नसल्याची चर्चा आहे तसेच काही दिवसांपूर्वी याच बसमालकासोबत प्रादेशिक परिवहन विभागातील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांची कथित आर्थिक हातमिळवणी झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे या चर्चेची निष्पक्ष चौकशी करून सत्य समोर आणावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### शालेय बसमध्ये महिला सेवक का नव्हती?

या घटनेनंतर शालेय बसच्या सुरक्षिततेचा अत्यंत गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित शालेय बसमध्ये चालकासोबत विद्यार्थ्यांची सुरक्षितपणे देखरेख करण्यासाठी महिला सेवक असणे अपेक्षित असताना घटनेच्या वेळी महिला सेवक उपस्थित नसल्याची माहिती समोर येत आहे.

## संपादकीय ......

# संघाचा युवासंवाद

देशाच्या राजकारणात एक महत्त्वाचा बदल घडताना दिसत आहे. राजकीय व्यवस्थेच्या पारंपरिक पद्धती आणि नव्या पिढीच्या अपेक्षांमधील संघर्ष मुख्य पटलावर आला आहे. शिक्षण, बेरोजगारी, गुणवत्तेवर आधारित संधी, सरकारी व्यवस्थेतील पारदर्शकता आणि सर्वात म्हणजे भविष्यातील सुरक्षितता या प्रश्नांवर तरुणांमधील अस्वस्थता समाजमाध्यमांपुरती मर्यादित न राहता रस्त्यावर उतरली. त्यामुळे 'जनरेशन झेड'च्या आंदोलनांकडे राजकीय पक्षांनाही नव्या नजरेने पाहावे लागत आहे. विशेषतः सत्ताधारी पक्षाचा दृष्टिकोन बदलणे अधिक गरजेचे असल्याचे जंतर-मंतरवरील आंदोलनाने स्पष्ट केले. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मुंबईतील एका युवककेंद्री कार्यक्रमात तरुणांच्या आंदोलनाला थेट देशविरोधी ठरवण्याच्या भूमिकेपासून अंतर राखले. आंदोलन हा लोकशाहीतील संवादाचा एक मार्ग आहे.

तरुणांच्या तक्रारी खऱ्या आहेत आणि शिक्षणव्यवस्थेत बरेच काही करण्याची गरज आहे. आंदोलनाचा उद्देश व्यक्तीला लक्ष्य करणे नसून व्यवस्थेत सुधारणा घडवणे आणि सहमती निर्माण करणे असावा, असे त्यांनी स्पष्ट केले. ही भूमिका अचानक आलेली नाही. काही दिवस आधीच भागवत यांनी आजची तरुणाई पूर्वीच्या पिढीसारखी केवळ आदेश स्वीकारत नाही. ती प्रश्न विचारते, कारणे मागते. त्यांच्याशी संवाद साधावा लागतो, असे म्हटले होते. याचा राजकीय अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. दक्षिण आशियात राजकीय, सामाजिक चर्चेच्या केंद्रस्थानी आलेली 'जेन-झी' ही राजकीय पक्षांच्या पारंपरिक संघटनात्मक चौकटीत सहज बसणारी पिढी नाही. तिचे राजकीय आकलन समाजमाध्यमांतून तयार होत असले, तरी ती नेत्यांच्या भाषणापेक्षा त्यांच्या कृतीकडे पाहते. पक्षाच्या घोषणापत्रांपेक्षा प्रत्यक्ष अनुभवाला आणि जमिनीवरील वास्तवाला अधिक महत्त्व देते. परीक्षा रद्द, प्रश्नपत्रिका फुटली, भरतीत विलंब किंवा रोजगार संधी कमी झाली, तर या पिढीला प्रशासकीय स्पष्टीकरणापेक्षा 'आमचे नुकसान का झाले' हा प्रश्न अधिक महत्त्वाचा वाटतो. आंदोलनांमुळे शिक्षणमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही तरुण मतदारांशी समाजमाध्यमांद्वारे थेट संवादाचा प्रयत्न सुरू केला आहे. भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नितीन नवीन यांची नियुक्ती करण्यामागेही युवाशक्तीला प्रभावित करणे हाच मुख्य हेतू होता.

२०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी तरुण मतदारांचा वाढता प्रभाव लक्षात घेता राजकीय पक्षांना हे बदल महत्त्वाचे वाटत आहेत. भागवतांची वक्तव्ये केवळ सामाजिक भाष्य म्हणून पाहणे संयुक्तिक ठरणार नाही. कारण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही भाजपची मातृसंस्था आहे. सरकार चालवताना भाजपला अनेक व्यावहारिक आणि राजकीय तडजोडी कराव्या लागत असल्या, तरी संघ मात्र दीर्घकालीन सामाजिक परिणाम, संघटनात्मक स्वीकार आणि वैचारिक सातत्य याकडे पाहताना दिसतो. या रचनेमुळे एखाद्या सरकारी निर्णयाबाबत दोघांची भूमिका सारखीच असेल, असे नाही. भागवतांनी गतवर्षी 'संघ आणि भाजप यांच्यात मतभेद असू शकतात; पण मनभेद नाहीत', असे म्हटले होते. म्हणूनच 'जेन झी'च्या आंदोलनाबाबत भागवतांचे वक्तव्य थेट सरकारविरोधी नसले, तरी सरकारच्या पद्धतीवर अप्रत्यक्ष प्रश्न उपस्थित करणारे आहे. तरुणांना फक्त समजावून सांगण्याऐवजी त्यांचे म्हणणे ऐकावे लागेल. विरोध करणाऱ्यांना देशविरोधी ठरवून प्रश्न सुटणार नाहीत.जेन झीच्या तक्रारी खऱ्या आहेत. ही संघाची भूमिका सत्ताधाऱ्यांसाठी महत्त्वाची सूचना आहे. आंदोलनामागे राजकीय शक्ती आहेत की नाहीत, हा प्रश्न वेगळा; परंतु त्यामागील मूळ समस्या खरी आहे का, हा त्याहून महत्त्वाचा प्रश्न. भागवतांनी हा फरक अधोरेखित केला. यातून एक राजकीय गरजही ध्वनित होते. भाजपचा सर्वात मोठा सामाजिक आधार पारंपरिक मतदारांबरोबरच मध्यमवर्गीय, शिक्षित, आकांक्षी आणि रोजगाराच्या संधी शोधणाऱ्या तरुणांचा आहे. या वर्गात असंतोष दीर्घकाळ टिकला, तर त्याचा प्रतिकूल परिणाम सत्ताधारी पक्षावर होऊ शकतो. त्यामुळे संघाला केवळ वैचारिक निष्ठा पुरेशी वाटत नाही. नव्या पिढीशी भावनिक आणि वैचारिक संवादही आवश्यक वाटतो. हे लक्षात घेता भागवतांची वक्तव्ये संघाच्या बदलत्या संवाद पद्धतीचे संकेत म्हणावी लागतील.

पूर्वी संघाची भाषा प्रामुख्याने संस्कार, शिस्त, कर्तव्य, राष्ट्र आणि संघटनाभोवती फिरत असे. आता त्यात प्रश्न विचारणाऱ्या तरुणांना स्वीकारण्याची भाषा स्पष्टपणे दिसते. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारच्या काळातही संघ परिवारातील स्वदेशी जागरण मंचाने निर्गुंतवणूक धोरणावरून भाजप सरकारवर टीका केली होती. भाजप सरकारच्या प्रत्येक निर्णयाला पाठिंबा देणे, ही संघाची परंपरा नाही. मोदींच्या काळात २०१५ मध्ये भूसंपादन विधेयकातील काही तरतुदींना संघप्रेरित संघटनांनी विरोध केला. २०१८ मध्ये किरकोळ व्यापारातील परकीय गुंतवणुकीचे नियम शिथिल करण्याचा निर्णय असेल किंवा २०२० मध्ये कृषी कायदे असतील. त्यांबाबत सामाजिक मत आणि राष्ट्रीय हित यांना प्राधान्य देणारी भूमिका संघाने घेतली होती. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपच्या जागा घटल्या तेव्हाही भागवतांनी अहंकार टाळण्याचा, विरोधकांकडे शत्रू म्हणून नव्हे, तर वेगळे मत मांडणारा प्रतिपक्ष म्हणून पाहण्याचा आणि संवाद व सहमतीचे महत्त्व मान्य करण्याचा संदेश दिला. आता जेन झी आंदोलनानंतर पुन्हा तीच भाषा पुढे आली आहे. फरक एवढाच की, यावेळी लक्ष्य राजकीय विरोधक नसून तरुण पिढी आहे.

# जन्म-मृत्यू दाखल्यासाठी नवा ऑनलाइन अडथळा

## ग्रामीण नागरिक हैराणजुना दाखला नसल्यास नोंद असूनही प्रमाणपत्र मिळेना

### लोकप्रतिनिधींनी हस्तक्षेप करण्याची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८चांदूर रेल्वे :**
ग्रामपंचायतीच्या दप्तरी जन्म अथवा मृत्यूची अधिकृत नोंद उपलब्ध असतांनाही संबंधित नागरिकांना थेट ग्रामपंचायतीतून जन्म किंवा मृत्यूचा दाखला मिळत नसल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. जिल्हा परिषदेकडून ऑनलाइन मंजुरी घेण्याची सक्ती करण्यात आल्याने प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया अधिकच क्लिष्ट झाली आहे. यात लोकप्रतिनिधींनी हस्तक्षेप करण्याची मागणी ग्रामिण भागातून होत आहे.नवीन कार्यपद्धतीनुसार, ग्रामपंचायतीकडे उपलब्ध असलेली जन्म किंवा मृत्यूची नोंद जिल्हा परिषदेच्या ऑनलाइन पोर्टलवर अपलोड करावी लागते. मात्र, त्यासोबत संबंधित व्यक्तीचा यापूर्वीचा जन्म किंवा मृत्यूचा दाखलाही ऑनलाइन अपलोड करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे अनेक वर्षांपूर्वीच्या नोंदी असलेल्या नागरिकांसमोर मोठी अडचण निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांकडे जुने दाखले उपलब्ध नसतात. अशा वेळी ग्रामपंचायतीच्या नोंदवहीत स्पष्ट नोंद असूनही नवीन प्रमाणपत्र मिळू शकत नाही. परिणामी संबंधित व्यक्तीला किंवा त्यांच्या कुटुंबीयांना पुन्हा तहसीलदार कार्यालयामार्फत नव्याने अर्ज करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागते. या प्रक्रियेला दोन ते तीन महिन्यांचा कालावधी लागत असल्याने शैक्षणिक प्रवेश, नोकरी, वारसा, पेन्शन, बँकिंग तसेच इतर शासकीय कामे रखडत आहेत. विशेष म्हणजे, शासनाकडे अधिकृत नोंद उपलब्ध असतानाही केवळ जुना दाखला नसल्यामुळे नागरिकांना प्रमाणपत्रापासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि ग्रामीण भागातील नागरिकांना वारंवार सरकारी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत असून वेळ आणि पैशाचा मोठा भुर्दंड सहन करावा लागत आहे. या समस्येवर शासनाने तातडीने उपाययोजना करून ग्रामपंचायतीच्या मूळ नोंदीच्या आधारेच जन्म व मृत्यू दाखले देण्याची व्यवस्था करावी, तसेच जुन्या दाखल्याची सक्ती शिथिल करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

#### शासनाच्या निर्देशांनुसारच प्रक्रिया - डीएचओ, अमरावती

ग्रामपंचायतीच्या दप्तरी जन्म किंवा मृत्यूची नोंद असली तरी नवीन प्रमाणपत्र काढण्यासाठी पूर्वी जारी करण्यात आलेल्या जन्म किंवा मृत्यू दाखल्याची प्रत आवश्यक आहे. संबंधित जुना दाखला उपलब्ध नसल्यास नियमानुसार तहसीलदारांमार्फत जन्म किंवा मृत्यू प्रमाणपत्राची प्रक्रिया पूर्ण करून त्यानंतरच आवश्यक नोंद अद्ययावत करून नवीन प्रमाणपत्र देण्यात येते. ही प्रक्रिया शासनाच्या निर्देशांनुसार राबविली जात आहे.

**डॉ. प्रविण पारिसे,** जिल्हा आरोग्य अधिकारी, अमरावती.

#### नोंद असताना नागरिकांना त्रास देणे अन्यायकारक - अनिल वानखडे, घुईखेड

ग्रामपंचायतीच्या अधिकृत नोंदवहीत जन्म किंवा मृत्यूची नोंद असतांना केवळ जुना दाखला उपलब्ध नाही म्हणून नागरिकांना प्रमाणपत्र नाकारणे योग्य नाही. अशा प्रकरणांत नागरिकांना पुन्हा तहसीलदारांकडे जाऊन प्रक्रिया पूर्ण करावी लागते, ही अत्यंत त्रासदायक बाब आहे. विशेष म्हणजे, ग्रामपंचायतीच्या दप्तरी नोंद असताना 'नोंद नाही' असा दाखला देणेही कायदेशीरदृष्ट्या योग्य वाटत नाही. शासनाने या प्रक्रियेत तातडीने सुधारणा करून ग्रामपंचायतीच्या मूळ नोंदीच्या आधारेच जन्म व मृत्यू दाखले देण्याची सुलभ व्यवस्था करावी. याबाबत लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने गंभीरपणे लक्ष घालण्याची गरज आहे. **अनिल वानखडे,** प्रशासक उपसरपंच, घुईखेड तथा शिवसेना समन्वयक धामणगाव मतदार संघ

# CET च्या प्रथम यादीत डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचा समावेश

## देशभरातील केवळ ९३ विधी महाविद्यालयांमध्ये स्थान

### विदर्भातील मोजक्या महाविद्यालयांपैकी एक होण्याचा बहुमान



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.८अमरावती,**
श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती (Dr. PDCL) यांनी राष्ट्रीय स्तरावर आणखी एक मानाचा टप्पा गाठला आहे. बार कौन्सिल ऑफ इंडिया (BCI) मान्यताप्राप्त डु उएढ प्रवेश प्रक्रियेच्या प्रथम यादीत देशभरातील केवळ ९३ विधी महाविद्यालयांना स्थान देण्यात आले असून, त्यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचा सन्मानपूर्वक समावेश झाला आहे. या यशामुळे अमरावतीसह संपूर्ण विदर्भाच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, विदर्भातील अत्यंत मोजक्या विधी महाविद्यालयांना या यादीत स्थान मिळाले असून, डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती आणि आर. आर. राठी विधी महाविद्यालय, वाशीम या संस्थांना हा मान मिळाला आहे. त्यामुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण विधी शिक्षणाची आणि राष्ट्रीय निकषांनुसार केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची पुन्हा एकदा दखल घेण्यात आली आहे.महाविद्यालयाने बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या शैक्षणिक, प्रशासकीय व पायाभूत सुविधांशी संबंधित सर्व निकषांचे काटेकोर पालन करत विद्यार्थ्यांना दर्जेदार विधी शिक्षण उपलब्ध करून दिले आहे. अनुभवी प्राध्यापकवर्ग, आधुनिक शैक्षणिक सुविधा, न्यायालयीन प्रात्यक्षिके, संशोधनाला प्रोत्साहन आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रम यांच्या बळावर महाविद्यालयाने राज्यासह राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, तसेच सर्व कार्यकारी परिषदेच्या वतीने महाविद्यालयाचे अभिनंदन करण्यात आले आहे-

# उद्याला विदर्भस्तरीय सायकल स्पर्धा

## ४०० सायकलपटुंचा सहभाग : विविध वयोगटाला संधी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती-** अमरावती सायकलींग असोसिएशन, दिशा संस्था तसेच हव्याप्र मंडळद्वारा संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावतीत तृतीय विदर्भस्तरीय सायकल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. रविवारी (ता. ९) सकाळी ६.३० वाजता या स्पर्धेला अंजनगावबारी मार्गावरील प्रो. राम मेघे इंजीनियरिंग कॉलेज येथून सुरवात होणार आहे. या स्पर्धेमध्ये विदर्भाच्या विविध जिल्ह्यांमधून ४०० स्पर्धकांनी भाग घेतला आहे.

प्रो. राम मेघे इंजिनिअरिंग जुने कॉलेज ते अंजनगाव बारी रोड, उदखेड, पार्डी, रेल्वे अंडरपास पर्यंतचा संपूर्ण रस्ता स्पर्धेदरम्यान बंद करण्यात येणार आहे. तसेच म्बुलन्स व वैद्यकीय चमू ही जिल्हा सामान्य रुग्णालय, झेनिथ हॉस्पिटल, दुर्वांकुर हॉस्पिटल व रिंम्स हॉस्पिटल यांच्या तर्फे उपलब्ध करण्यात येणार आहे. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ तर्फे १२५ ऑफिशियल्स व अमरावती सायकलिंग असोसिएशन यांचे २०० स्वयंसेवक या स्पर्धेची संपूर्ण तयारी करीत आहेत. अमरावती पोलिस आयुक्तालय व अमरावती सायकलींग असोसिएशन द्वारे अमली पदार्थ विरोधी जनजागृती अभियान अंतर्गत या शालेय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेच्या शेवटी पोलिस विभाग व असोसिएशन मार्फत जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे. शाळकरी मुलांपासून मोठ्या लोकांपर्यंत विविध वयोगटासाठी ही स्पर्धा राहणार असून यामध्ये प्रत्येक गटांमध्ये पाच हजार, तीन हजार व दोन हजार रुपये असे तीन पारितोषिक व ट्रॉफी दिली जाणार आहे. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या प्रत्येकाला ई सर्टिफिकेट व मेडल दिले जाईल, अशी माहिती आज पत्रपरिषदेत असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. चंद्रशेखर कुळकर्णी, सचिव अतुल कळमकर यांनी दिली.

# मेळघाटात पोषण आहारासाठी शाळांना फक्त तांदूळ



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.८जामली-** शासनाच्या पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना सकस व पौष्टिक आहार देण्याचा उद्देश असला, तरी प्रत्यक्षात अनेक शाळांना जुलै महिन्यात केवळ तांदळाचा साठाच प्राप्त झाला आहे. तेल, डाळ, हळद, मिरची, मसाले, मीठ तसेच इतर आवश्यक खाद्यसाहित्य अद्याप शाळांपर्यंत पोहोचले नसल्याने पोषण आहार योजना अडचणीत सापडली आहे. शाळा सुरू होऊन महिनाभराहून अधिक कालावधी उलटूनही आवश्यक धान्यादी माल मिळालेला नाही. हा माल नेमका कधी मिळणार, याबाबतही संबंधित शाळांना कोणतीही माहिती देण्यात आलेली नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पोषण आहार कसा तयार केला जात आहे, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आवश्यक साहित्य मुख्याध्यापक स्वतःच्या खर्चाने विकत आणत आहेत का, किंवा त्यासाठी शासनाकडून स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे का, याबाबतही स्पष्टता नसल्याने संभ्रमाचे वातावरण आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांचा पोषण आहार खंडित होऊ नये म्हणून काही शाळा स्थानिक पातळीवर तात्पुरती व्यवस्था करत असल्याची माहिती आहे. मात्र याचा आर्थिक भार कोण उचलणार, याबाबत शिक्षण विभागाने तातडीने भूमिका स्पष्ट करून आवश्यक धान्य व इतर साहित्याचा पुरवठा त्वरित करावा, अशी मागणी मुख्याध्यापक व पालकांकडून होत आहे.

# जवळापूरचा दीड किलोमीटर रस्ता गेला खड्ड्यांत

## जीवघेणा प्रवास, तातडीच्या दुरुस्तीची नागरिकांची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८पथ्रोट-** जिल्हा परिषद बांधकाम विभागाने सुमारे सहा वर्षांपूर्वी बांधलेला जवळापूर गावाकडे जाणारा दीड किलोमीटर लांबीचा डांबरी रस्ता सध्या पूर्णपणे खड्डेमय झाला आहे. रस्त्यावर खड्डे की खड्ड्यांत रस्ता, अशी अवस्था निर्माण झाल्याने वाहनचालकांसह ग्रामस्थांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. नागरिकांनी या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. महामार्गापासून जवळापूर गावापर्यंतचा हा प्रमुख संपर्कमार्ग असून दररोज ग्रामस्थ, विद्यार्थी, शेतकरी आणि रुग्णवाहिका याच मार्गाचा वापर करतात. मात्र, रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहतूक धोकादायक झाली आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. परिणामी, लहान-मोठे अपघात नित्याचे झाले असून वाहनांचे नुकसानही होत आहे. गर्भवती महिला, रुग्ण तसेच शाळा व महाविद्यालयात ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पायदळ प्रवाशांनाही रस्त्याच्या कडेला तोल सांभाळत चालावे लागत आहे. रात्रीच्या वेळी प्रकाशव्यवस्थेचा अभाव असल्याने हा प्रवास अधिकच धोकादायक ठरत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना शेती असल्याने शेतकरी व शेतमजुरांना शेतीची अवजारे, खत, बियाणे तसेच शेतीमालाची वाहतूक करताना मोठी कसरत करावी लागत आहे. बैलगाड्या व इतर वाहनांचीही मोठी गैरसोय होत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, रस्ता बांधल्यानंतर सुरवातीची दोन वर्षे त्याची स्थिती चांगली होती. त्यानंतर हळूहळू खड्डे पडण्यास सुरवात झाली. गेल्या चार वर्षांत दुरुस्ती न झाल्याने रस्ता पूर्णपणे खराब झाला आहे.किमान तात्पुरती दुरुस्ती करा नवीन रस्त्याचे काम होईपर्यंत किमान खड्ड्यांमध्ये मुरूम टाकून तात्पुरती दुरुस्ती करावी आणि त्यानंतर दर्जेदार पद्धतीने रस्त्याचे पुनर्बांधकाम करावे, अशी मागणी जवळापूर ग्रामस्थांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे केली आहे.

**किमान तात्पुरती दुरुस्ती करा**

नवीन रस्त्याचे काम होईपर्यंत किमान खड्ड्यांमध्ये मुरूम टाकून तात्पुरती दुरुस्ती करावी आणि त्यानंतर दर्जेदार पद्धतीने रस्त्याचे पुनर्बांधकाम करावे, अशी मागणी जवळापूर ग्रामस्थांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडे केली आहे.

# अंजनगावात ग्रीन रिबन अभियान

## जागतिक अवयवदान पंधरवड्यानिमित्त ग्रामीण रुग्णालयाचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अंजनगावसुर्जी**
जागतिक अवयवदान पंधरवड्यानिमित्त अंजनगावसुर्जी येथील ग्रामीण रुग्णालयात ग्रीन रिबन जनजागृती अभियान उत्साहात पार पडले. 'अवयवदान म्हणजे जीवनदान' हा संदेश देत नागरिकांमध्ये अवयवदानाबाबत जागरूकता निर्माण करण्यावर भर देण्यात आला. ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षिका डॉ. मेधा गिरेपुंजे यांनी अवयवदानाचे वैद्यकीय, सामाजिक आणि मानवी महत्त्व विशद केले. एका व्यक्तीच्या अवयवदानामुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळू शकते. त्यामुळे प्रत्येकाने अवयवदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवून समाजात जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच अवयवदानाची प्रक्रिया, कायदेशीर बाबी आणि मृत्यूनंतर अवयवदानाचे महत्त्व, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहम्मद शाकीब, डॉ. एन. रेखाते, डॉ. तरुण पटेल, डॉ. मोहोळ, डॉ. सुवर्णा बिऱ्हाळे, डॉ. शाहिद, भाग्यश्री अस्वार, अधिपरिचारिका रुचिता वानखडे, ब्रदर निखिल चोपडे, अमोल राऊत, श्वेता तायडे तसेच ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये अवयवदाना बाबत जागरूकता वाढण्यास मदत झाली.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# तक्रारीनंतर आली पालिका प्रशासनाला जाग पाणी शुद्धीकरणासह उपाययोजना सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८चांदुर रेल्वे**

शहरातील पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेबाबत माजी नगर परिषद उपाध्यक्ष तथा आम आदमी पक्षाचे नेते नितीन गवळी यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून, त्यांच्या तक्रारीनंतर नगर परिषद प्रशासनाने जिल्हाधिकाऱ्यांकडे सविस्तर प्रशासकीय खुलासा सादर केला आहे. तसेच पाणी शुद्धीकरण, निर्जंतुकीकरण आणि गळती दुरुस्तीची कामे सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. शहरात दूषित पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार नितीन गवळी यांनी अन्न व औषधी प्रशासन (एफडीए), अमरावती विभागाकडे ऑनलाईन दाखल केली होती. त्याची दखल घेत एफडीएने हे प्रकरण नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांकडे वर्ग करून आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर नगर परिषद प्रशासनाने जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या खुलाशात, मालखेड तलावातील उन्हाळ्यातील कमी जलसाठ्यामुळे पाणी काही प्रमाणात गढूळ होत असले तरी नागरिकांना पुरवठा करण्यापूर्वी तुरटी, क्लोरिन व ब्लिचिंग पावडरद्वारे पाण्याचे शुद्धीकरण केले जात असल्याचे नमूद केले आहे. तसेच नागरिकांना पाणी उकळून व गाळून पिण्याबाबत वेळोवेळी दवंडी व लाऊडस्पीकरद्वारे सूचना देण्यात आल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.प्रयोगशाळेच्या तपासणीत दूषित आढळलेले तीन नमुने हे नगर परिषदेच्या सार्वजनिक नळयोजनेतील नसून खाजगी विहीर व बोअरवेलमधील असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. संबंधित विहीर व बोअरवेलधारकांना सूचना देण्यात आल्या असून पाईपलाईन व व्हॉल्व्ह दुरुस्ती, निर्जंतुकीकरण आणि ब्लिचिंग पावडरद्वारे शुद्धीकरण सुरू असल्याचेही खुलाशात नमूद करण्यात आले आहे. तसेच भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेलाही आवश्यक कार्यवाही साठी पत्र पाठविण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. दरम्यान, ५ ऑगस्ट रोजी नितीन गवळी व माजी नगरसेवक मेहमूद हुसेन यांनी नगर परिषद कर्मचाऱ्यांसमवेत मालखेड तलाव आणि शहराच्या पाणी पुरवठा यंत्रणेची प्रत्यक्ष पाहणी केली. नागरिकांना सुरक्षित व स्वच्छ पिण्याचे पाणी मिळावे, यासाठी आवश्यक सुधारणा तातडीने पूर्ण करण्याची मागणी त्यांनी केली. नितीन गवळी यांच्या पाठपुराव्यामुळे प्रशासना ला या विषयावर अधिकृत भूमिका स्पष्ट करावी लागली असून, पाणीपुरवठा व्यवस्थेतील सुधारणा आणि नियमित तपासणीबाबतची कार्यवाही गतिमान होण्याची अपेक्षा शहरवासीयांना आहे.



# मुथूट फिनकॉर्प अपहार प्रकरणात मोठे मासे रडारवर

## कोट्यवधींचा गोलमाल : शुभमच्या दोन सहकाऱ्यांना १० ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती–** सोने तारण घेऊन कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या मुथूट फिनकॉर्पचा शाखा व्यवस्थापक कोतवाली पोलिसांच्या कोठडीत असतानाच गुरुवारी (ता. ६) रात्री कंपनीच्या अन्य दोघा सहकाऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांना न्यायालयाने १० ऑगस्टपर्यंत पीसीआर दिला आहे. या अपहारप्रकरणात अन्य मोठे मासेही पोलिसांच्या रडारवर आहेत. सूरज अनिल खेरकार (रा. छांगणीनगर, अमरावती) व धीरज पंचम शिरसाट (रा. निंभा, ता. भातकुली) अशी अटक दोघांची नावे असल्याची माहिती शहर कोतवालीचे पोलिस निरीक्षक रोशन शिरसाट यांनी दिली. यापूर्वी अटक करण्यात आलेला मुख्य सूत्रधार शुभम रवींद्र वासेवाय (वय ३१) हा १० ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडीत असून, शुभमच्या अखत्यारीत काम करणाऱ्या अन्य दोघांना सुद्धा गुरुवारी अटक करण्यात आली. त्यांना न्यायालयासमोर हजर केले होते. न्यायालयाने त्या दोघा संशयितांना सुद्धा पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे कोट्यवधींच्या अपहार प्रकरणात अटक संशयितांची संख्याही तीनवर पोहचली आहे. पोलिस कोठडीत असलेल्या शुभम वासेवाय याच्या बँक खात्याची माहिती पोलिसांनी संबंधित बँकेकडून मागितली आहे. शुभमने स्वत:च्या बँकखात्यात अपहाराचे पैसे कमी आणि नातेवाईक व इतर ओळखीतील काही लोकांच्याच बँकखात्यात जमा केल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहेत. पहिल्या टप्प्यात ७०० ग्रॅम सोने आणि ४५ लाख रुपयांच्या रोख रकमेचा हा अपहार असल्याची बाब पुढे आली होती. परंतु जसजसा तपास पुढे सरकत आहे, तसे नवनवीन तथ्य पुढे येत असल्याची माहिती पोलिस उपायुक्त श्याम घुगे यांनी दिली.




### दोघांच्याही बँक खात्यात कोट्यवधींची उलाढाल

मुथूट फिनकॉर्प लिमीटेड मध्ये एक्झीकेटीव्ह म्हणून नोकरी करणाऱ्या धीरज शिरसाट आणि सूरज खेरकार या दोघांच्या बँकखात्यामध्ये क्षमतेपेक्षा अधिक आर्थिक उलाढाल करण्यात आली. ती रक्कम त्या दोघांनी इतर खात्यामध्ये वळती केल्याची बाब पोलिस चौकशीतून पुढे आली आहे. असे कोतवालीचे पोलिस निरीक्षक रोशन शिरसाट यांनी सांगितले.

### ४५ दिवसांनी होते ऑडिट

सोने तारण ठेवून कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या मुथूट फिनकॉर्प लि. मध्ये आर्थिक ताळेबंद योग्य पद्धतीने व्हावा याकरिता वरिष्ठ स्तरावरून ४५ दिवसानंतर संबंधित शाखेचे ऑडिट केल्या जात असल्याची माहिती कंपनीच्या वरिष्ठांनी पोलिसांना दिली. असे असेल तर, दोन वर्षांपासून सुरू असलेला आर्थिक गैरव्यवहार तेव्हा कुणाच्या लक्षात कसा आला नाही, हा प्रश्न कायम आहे.

# परतवाड्यात शोभिवंत झाडे लावण्याचा मुहूर्त कधी?



## पावसाळा सुरू होऊनही संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८परतवाडा–** शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी शहरातून जाणाऱ्या मुख्य मार्गावरील दुभाजकासह इतर आवश्यक ठिकाणी शोभिवंत झाडे लावण्याची मागणी वारंवार होत असतानाही संबंधित प्रशासनाकडून अद्याप कार्यवाही करण्यात आलेली नाही. पावसाळा सुरू होऊनही दुभाजकांवर ही झाडे लावण्याचा मुहूर्त मिळत नसल्याचे चित्र आहे.शहरातील मार्गावरील दुभाजकावर शोभिवंत, आकर्षक व पर्यावरणपूरक झाडे लावण्यात यावीत, या मागणीने जोर धरले आहे. दुभाजकावर विद्युत खांब उभारण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर शोभिवंत झाडे लावण्यात येतील, असे नगरपरिषद प्रशासनाकडून सांगण्यात आले होते.मात्र, विद्युत खांब उभारून बराच कालावधी उलटून गेला असतानाही दुभाजकांवर अद्याप झाडे लावण्यात आलेली नाहीत. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून झाडांच्या लागवडीसाठी हा योग्य कालावधी असतानाही प्रशासनाकडून विलंब होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. शहरातील इतर भागात वृक्षारोपण करण्यासोबत च मुख्य मार्गावरील दुभाजकावर शोभिवंत झाडे लावल्यास शहराच्या सौंदर्यात निश्चितच भर पडणार आहे. त्यामुळे संबधित प्रशासन व लोकप्रतिनिधींनी याकडे तातडीने लक्ष दयावे. अशी मागणी नागरिकांकडून पुढे येत आहे.

# कर्जमाफीच्या पहिल्या यादीतून १० हजार शेतकरी गळणार

## ॲग्रीस्टॅक नोंदणी व फार्मर आयडी मिळेना, ई केवायकी करणार कसे?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती**

राज्य सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत अजूनही १९ हजार पात्र शेतकऱ्यांनी ई केवायसी केलेली नाही. दरम्यान ही प्रक्रिया सुरू असून किमान दहा हजार शेतकरी वगळल्या जाण्याची शक्यता सहकार विभागाने व्यक्त केली आहे. ॲग्रीस्टॅक नोंदणी न झाल्याने फार्मर आयडी मिळालेला नाही अशा शेतकऱ्यांचा गळणाऱ्या यादीत समावेश होणार आहे. तथापि अद्याप पात्र व इकेवायसी केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा झाली नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. अमरावती जिल्ह्यातील १ लाख २४ हजार १४२ शेतकऱ्यांचे खाते कर्जमाफी योजनेसाठी पोर्टलवर अपलोड करण्यात आले होते. त्यापैकी राज्य शासनाने प्रसिद्ध केलेल्या पहिल्या यादीत ७६ हजार ३५० शेतकरी योजनेच्या लाभासाठी पात्र ठरविण्यात आले आहे. पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना ई केवायसी करणे अनिवार्य आहे. ॲग्रीस्टॅक व फार्मर आयडी असलेल्या शेतकऱ्यांनाच या योजनेचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे पहिल्या यादीत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांनी ईकेवायसी करण्याचे आवाहन सहकार विभागाने केले आहे. जिल्ह्यातील पहिल्या यादीत पात्र ठरलेल्या ७६ हजार ३५० शेतकऱ्यांपैकी आतापर्यंत ५७ हजार ३५० शेतकऱ्यांची ई केवायसी प्रक्रिया पुर्ण झाली आहे. अजूनही १९ हजार शेतकऱ्यांची शिल्लक आहे.

१० हजारावर शेतकरी गळणार ई केवायसी करू न शकणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या दहा हजाराच्या जवळपास पोहोचण्याची शक्यता सहकार विभागाने व्यक्त केली आहे. यामागे विविध कारणे असल्याचेही सांगण्यात आले असून त्यामध्ये प्रामुख्याने ॲग्रीस्टॅक हे मुख्य कारणांपैकी एक असल्याचे सांगण्यात येत आहे. काही शेतकरी मयत झाले असून त्यांच्या शेतजमिनी वारसांच्या नावे झाल्या आहेत. मात्र त्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी झालेली नाही. काहींचे ॲग्रीस्टॅक असले तरी त्यांनी जमिनी विकल्या आहेत. त्यांचा फेरफार झालेला नाही. वनजमिनीवरील शेतींचे ॲग्रीस्टॅक होत नाही. अशा शेतकऱ्यांचा आकडा मोठा असून तो दहा हजाराच्या जवळपास पोहोचण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. कर्जमाफीची रक्कम जमाच नाही पहिल्या यादीतीली पात्र शेतकऱ्यांनी ई केवायसी प्रक्रिया पुर्ण केली असली तरी अद्यापही त्यांच्या खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा झालेली नाही. जिल्ह्यात अशा शेतकऱ्यांची संख्या ५७ हजार ३५० इतकी आहे. पोर्टलवर तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याचे कारण त्यासाठी समोर करण्यात आले असले तरी अद्याप सरकारकडूनच ही रक्कम बँकांना वर्ग करण्यात आली नसल्याचे समजते.





## गृहमंत्री शहा यांना भेटले खा. अनिल बोंडे

देशाचे गृहमंत्री अमित शहा यांची शुक्रवारी राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे व त्यांच्या पत्नी डॉ. वसुधा बोंडे यांनी दिल्लीत भेट घेतली. यावेळी विविध विषयांवर त्यांच्यात चर्चा झाली. खा. बोंडे राज्यसभेत नेहमीच सरकारची बाजु भक्कमपणे मांडत असतात.

# वर्ककोड, जॉबकार्ड त्रुटींमुळे चांदूर रेल्वे तालुक्यातील घरकुल निधी रखडला

## चांदूरवाडीचे उपसरपंच अब्दुल शहजाद उर्फ शेख सोनू यांचे बीडीओंना निवेदन

## १५ ऑगस्टपर्यंत प्रश्न न सुटल्यास आंदोलनाचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८चांदूर रेल्वे –** चांदूर रेल्वे तालुक्यातील ग्रामिण भागातील अनेक घरकुल लाभार्थ्यांना जॉबकार्डवरील चुकीचे क्रमांक तसेच अनेक लाभार्थ्यांचे वर्ककोड जनरेट न झाल्यामुळे घरकुलाचा निधी आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) मिळणारे मजुरीचे पैसे रखडल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या संदर्भात चांदूरवाडीचे उपसरपंच अब्दुल शहजाद अब्दुल रज्जाक (शेख सोनू) यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती चांदूर रेल्वे यांना लेखी निवेदन देऊन १५ ऑगस्टपर्यंत प्रश्न मार्गी न लावल्यास पंचायत समितीसमोर जनआंदोलन व उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, संपूर्ण तालुक्यात अनेक घरकुल लाभार्थ्यांच्या जॉबकार्डवरील क्रमांक चुकीचे नोंदविण्यात आले आहेत, तर अनेकांचे वर्ककोड अद्याप तयार झालेले नाहीत. त्यामुळे घरकुलासाठी मंजूर झालेला निधी तसेच मनरेगा अंतर्गत मिळणारी मजुरी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होत नसल्याने अनेकांचे घरांचे बांधकाम अर्धवट अवस्थेत आहे. या समस्येबाबत पंचायत समितीकडे गेल्या दोन वर्षांपासून वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप ठोस तोडगा निघालेला नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे १५ ऑगस्ट पर्यंत सर्व लाभार्थ्यांच्या अडचणी दूर करून रखडलेला निधी वितरित करण्यात यावा, अन्यथा पंचायत समिती चांदूर रेल्वे कार्यालया समोर जनआंदोलन व उपोषण करण्यात येईल. या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असा इशाराही चांदूर वाडीचे उपसरपंच अब्दुल शहजाद अब्दुल रज्जाक (शेख सोनू) यांनी निवेदनातून दिला आहे. या निवेदनाची प्रत तहसील दार तसेच पोलीस ठाणे, चांदूर रेल्वे यांनाही देण्यात आली आहे.

### दोन वर्षे झाली, शेवटचा हप्ता अजूनही नाही

माझे घरकुल सन २०२४ मध्ये मंजूर झाले. तेव्हा सुरुवातीला १५ हजार, त्यानंतर ४५ हजार आणि ४० हजार रुपये मिळाले. मात्र दोन वर्षे उलटूनही शेवटचा हप्ता मिळालेला नाही. तसेच मनरेगाचे मस्टर जमा न झाल्यामुळे २८ हजार रुपये सुध्दा अद्याप मिळाले नाहीत. एक घरकुल पूर्ण होण्यासाठी आणखी किती वर्षे वाट पाहावी लागणार ?


**गणेश ढोले,** घरकुल लाभार्थी, कळमजापूर.

# शकुंतला रेल्वे स्टेशन कार्यालयात चोरट्यांचा धिंगाणा

## पोलिसात तक्रार : रेल्वे स्थानक परिसरात आढळल्या दारूच्या बाटल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अचलपूर–** येथील शकुंतला रेल्वे स्टेशन परिसरातील तिकीट बुकिंग काउंटर कार्यालयाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी तेथील साहित्याची नासधूस करत धिंगाणा घातला. यासंदर्भात अचलपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या रेल्वे स्टेशन परिसरात मोठ्या प्रमाणात दारुड्यांचा ठिय्या असल्याचे चित्र नेहमी पाहयाला मिळते. यावेळी सुद्धा दारूच्या बाटल्या आणि चिवड्याची पाकिटे पडलेली असल्याचे पाहायला मिळाले. शकुंतला रेल्वे मागील सात वर्षांपासून बंद असली तरी येथे विविध ठिकाणी जाण्यासाठी बुकिंग काउंटर असून ते नियमित सुरू आहे. त्यामुळे या ठिकाणी कार्यरत लिपिकाने सायंकाळी कार्यालय बंद केले होते. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी आल्यावर कार्यालयाचे कुलूप तोडलेले दिसले तसेच संपूर्ण कार्यालयातील सामान अस्तव्यस्त असल्याचे दिसून आले. त्यामुळे लिपिकाने वरिष्ठांना माहिती देत ताबडतोब अचलपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. मागील सात वर्षांपासून शकुंतला रेल्वे बंद झाल्यामुळे फक्त बुकिंग काउंटर सुरू आहे. मात्र परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे वाढली आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संध्याकाळी कार्यालय बंद झाल्यावर चोरटे आणि दारुडे येथे जमतात. या परिसरात रात्रीच्या वेळी कोणीही येत नसल्याने चोरटे, दारुडे याचा फायदा घेत पार्ट्या करतात. काही महिन्यांपूर्वी महिला व पुरुषांनाही येथे पोलिसांनी पकडले होते. मात्र अद्यापही या ठिकाणी रात्रीस खेळ चालतो.



रात्री बुकिंग कार्यालयाचे कुलूप तोडून सामानाची नासधूस करण्यात आली होती. त्यासंदर्भात अचलपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

**– दिलीप पाटील,** तिकीट बुकिंग कर्मचारी, शकुंतला रेल्वे स्टेशन.

# चिखलदरा येथील राणी पार्कच्या प्रवेशद्वाराजवळ विशाल वृक्ष कोसळला

## मोठी दुर्घटना थोडक्यात टळलीसततच्या पावसामुळे गेटलगतचा वृक्ष अतिक्रमणावर पडला; अनेक पर्यटक बचावले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८चिखलदरा :** सतत सुरू असलेल्या पावसामुळे चिखलदरा येथील नगर परिषदेच्या एकमेव राणी पार्कच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील एक विशाल वृक्ष अचानक कोसळला. हा वृक्ष प्रवेशद्वाराजवळ उभारण्यात आलेल्या अतिक्रमणावर पडल्याने मोठी दुर्घटना टळली. घटनेच्या वेळी परिसरात अनेक पर्यटक उपस्थित होते. मात्र, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, वृक्ष काही क्षण आधी किंवा दुसऱ्या दिशेने कोसळला असता गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता होती. या घटनेनंतर काही काळ पार्कच्या प्रवेशमार्गावरील वाहतूक आणि पर्यटकांची ये-जा विस्कळीत झाली.

या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी राणी पार्कच्या मुख्य प्रवेशद्वारावरील दीर्घकाळापासूनचे अतिक्रमण तातडीने हटविण्याची तसेच पार्क परिसरातील धोकादायक व जीर्ण वृक्षांचे सर्वेक्षण करून आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तत्काळ कारवाई करावी, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.



## कुटीर महोत्सवाचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते उद्घाटन

# नागरिकांनी खादीचा वापर वाढवावा

– जिल्हाधिकारी आशिष येरेकर





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती,–**
शासनाने खादीच्या वापराला चालना देण्यासाठी विविध उपाययोजना केली आहे. शासकीय कर्मचाऱ्यांनाही एक दिवस खादीचे कापड घालणे बंधनकारक केले आहे. खादी उद्योगाच्या विकासासाठी नागरिकांनी खादीचा वापर वाढवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.

राष्ट्रीय हातमाग दिनाच्या पार्श्वभूमीवर एमआयडीसीमधील कस्तुरबा सोलर खादी महिला समितीच्या कुटीर महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदीप चेचरे, उद्योग सहसंचालक नीलेश निकम यांच्यासह कस्तुरबा खादी महिला समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.स्वातंत्र्य दिनाच्या औचित्याने हातमाग, खादी, सौर खादी तसेच पर्यावरणपूरक वस्त्रांना प्रोत्साहन देणे आणि ग्रामीण, आदिवासी महिलांच्या कौशल्याला सक्षम बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. कुटीर महोत्सव दि. ३० ऑगस्टपर्यंत चालणार आहे.जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी हातमाग व खादी ही केवळ वस्त्रनिर्मितीची परंपरा नसून ग्रामीण अर्थव्यवस्था, स्थानिक रोजगार आणि आत्मनिर्भरतेचा मजबूत आधार आहे. नागरिकांनी खादीचा वापर वाढविल्यास या क्षेत्राला सक्षम करण्यासाठी हातभार लागणार आहे. शासनाने खादी उद्योगाला सक्षम करण्यासाठी क्लस्टरची निर्मिती केली आहे. शासनाच्या वतीने या क्लस्टरला सक्षम करण्यासाठी सर्वोतोपरी मदत केली जाणार आहे, असे प्रतिपादन केले. कुटीर या ब्रँडच्या माध्यमातून सौर ऊर्जेवर चालणाऱ्या चरख्याद्वारे तयार होणारे सूत, खादी आणि सौरवस्त्र, तसेच हातमागावर तयार होणाऱ्या विविध उत्पादनांना आधुनिक डिझाइन आणि बाजारपेठेशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. या उपक्रमातून ग्रामीण व आदिवासी महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून, पारंपरिक कौशल्याला आधुनिक बाजारपेठेची जोड मिळत आहे.कुटीर महोत्सवाच्या उद्घाटनानंतर जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी सोलार चरखा, धागा तयार करण्याची प्रक्रिया, कापडावरील रंगकाम, एम्ब्रॉयडरी, कापडावरील प्रिंटींग आदीची पाहणी करून माहिती घेतली.

## वणी-सुलतानपूर मार्गावरील
# पुलाची दुरवस्था कायम

### पावसाळ्यात दुर्घटनेची टांगती तलवार, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८तिवसा–** तिवसा तालुक्यातील वणी-सुलतानपूर मार्गावरील नदीवरील पूल गेल्या तीन वर्षांपासून खचलेल्या अवस्थेत असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हा पूल आता नागरिकांसाठी अक्षरशः जीवघेणा ठरत आहे. दररोज अनेक गावांतील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि वाहनचालक या पुलावरून ये-जा करीत असतानाही पुलाच्या दुरुस्तीकडे संबंधित विभागाने गांभीर्याने लक्ष दिले नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.तीन वर्षांपूर्वी पुलाचा काही भाग खचला. त्यानंतर पुलाची पाहणी करून कायमस्वरूपी दुरुस्ती करण्याऐवजी परिस्थिती जैसे थेच राहिली. पुलाचा भाग खचल्यामुळे मोठमोठे दगड, सिमेंट आणि बांधकामाचे अवशेष बाहेर आले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना अतिशय सावधपणे वाहने चालवावी लागत असून, दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांसाठी तर हा मार्ग अधिकच धोकादायक बनला आहे.विशेषतः सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने नदीच्या पाणीपातळीत वाढ झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. नदीला मोठा पूर आल्यास पुलावरून वाहतूक करणे धोकादायक ठरू शकते. पुलाच्या कमकुवत स्थितीमुळे मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.पुलालगतच जिल्हा परिषद शाळा असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. शाळेत जाण्यासाठी विद्यार्थ्यांना याच मार्गाचा वापर करावा लागतो. पुलाची दुरवस्था आणि नदीतील पाण्याचा वाढता प्रवाह यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पालकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे.ग्रामस्थांनी संबंधित प्रशासनाकडे अनेकदा पाठपुरावा करून पुलाची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी केली आहे. मात्र तीन वर्षांचा कालावधी उलटूनही ठोस कार्यवाही न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.आता तरी प्रशासनाने कागदी आश्वासनांपलीकडे जाऊन पुलाची तातडीने पाहणी करावी, धोकादायक भागाची दुरुस्ती करावी आणि आवश्यक असल्यास नवीन पूल उभारण्याची कार्यवाही सुरू करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने जागे होणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## निवेदनांवर निवेदने, पण विकास शून्य

# चांदूर बाजार क्रीडा संकुल २० वर्षांपासून विकासाच्या प्रतीक्षेत

### कचरा डेपोच्या दुर्गंधीत खेळाडूंचा सराव,४०० मीटर धावपट्टीसह मूलभूत सुविधांची मागणी



**मुलींसाठी स्वतंत्र चेंजिंग रूमच उपलब्ध नाही**

आजच्या काळात महिलांच्या क्रीडा सहभागाला प्रोत्साहन देण्याची गरज असताना चांदूर बाजार क्रीडा संकुलात मुलींसाठी स्वतंत्र चेंजिंग रूमच उपलब्ध नाही यामुळे महिला खेळाडूंना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे तसेच स्वच्छ शौचालय आणि सुरक्षित वातावरणाचा अभावही प्रकर्षाने जाणवत असल्याची तक्रार आहे.

**४०० मीटर धावपट्टी विकसित करण्यात यावी**

क्रीडा संकुलातील २०० मीटर धावपट्टी पूर्णपणे खराब झाली असून अनेक ठिकाणी तिची अवस्था अत्यंत बिकट आहे या धावपट्टीवर दररोज शेकडो युवक पोलीस, सैन्य आणि इतर भरतीसाठी सराव करतात खराब धावपट्टीमुळे दुखापतीचा धोका वाढला खेळाडूंची मागणी आहे की विद्यमान धावपट्टीचे तात्काळ नूतनीकरण करून ४०० मीटर धावपट्टी विकसित करण्यात यावी तसेच १०० मीटर धावपट्टीची स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून द्यावी.

**कचरा डेपो आणि मासविक्री केंद्रामुळे आरोग्याचा प्रश्न**

क्रीडा संकुल परिसरालगत असलेला चांदूर बाजार नगरपालिकेचा कचरा डेपो आणि मासविक्री केंद्र हा खेळाडूंसाठी मोठा त्रास ठरत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे परिसरात सतत दुर्गंधी, अस्वच्छता आणि माश्यांचा उपद्रव असल्याने खेळाडूंना सराव करताना अडचणी येतात आरोग्याच्या दृष्टीनेही ही परिस्थिती गंभीर असल्याने हे दोन्ही उपक्रम तातडीने अन्यत्र स्थलांतरित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८चांदूर बाजार–** चांदूर बाजार तालुक्यातील एकमेशासकीय क्रीडा संकुल आज स्वतःच्या दुरवस्थेमुळे चर्चेचा विषय ठरले आहे ग्रामीण भागातील हजारो होतकरू खेळाडू, पोलीस व सैन्य भरतीची तयारी करणारे युवक-युवती, विविध शासकीय स्पर्धा परीक्षांसाठी शारीरिक सराव करणारे विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यासाठी उभारण्यात आलेले हे क्रीडा संकुल गेल्या जवळपास २० वर्षांपासून मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचा आरोप होत आहे १७ जुलै रोजी युवकांनी चांदूर बाजार तहसील कार्यालयात धडक देत तहसीलदार यांच्याकडे निवेदन देत तातडीने कारवाईची मागणी करण्यात आली असून अन्यथा तीव्र लोकशाही आंदोलनाचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे विशेष म्हणजे सन २०२३ आणि २०२५ मध्येही युवकांनी तहसील कार्यालयावर धडक देत निवेदने सादर केली होती मात्र त्यानंतरही ठोस उपाययोजना न झाल्याने खेळाडूंमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे आता पुन्हा एकदा तहसीलदार यांच्या मार्फत अमरावती जिल्हा क्रीडा अधिकारी यांना निवेदन देण्यात आले असून यावेळी शकडो युवकांनी तहसील कार्यालयात धडक दिली निवेदना नुसार क्रीडा संकुलातील २०० मीटर धावपट्टी पूर्णपणे खराब झाली असून ती धावपट्टी ४०० मीटर अंतराची करण्यात यावे मुलींसाठी स्वतंत्र चेंजिंग रूम नाही, शुद्ध पिण्याचे पाणी, स्वच्छ शौचालय, पथदिवे, गोळाफेक-भालाफेकसाठी सुविधा आणि नियमित देखभाल यांचा अभाव आहे याशिवाय संकुल परिसरालगत असलेला कचरा डेपो व मासविक्री केंद्रामुळे दुर्गंधी आणि अस्वच्छता निर्माण होत असल्याने ते तातडीने अन्यत्र स्थलांतरित करण्याचीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे यासह स्थानिक आमदार विकास निधी व इतर उपलब्ध निधीतून क्रीडा संकुलाचा सर्वांगीण विकास करण्याची मागणी यावेळी करण्यात आली आहे यावेळी सुपर व्हिजन अॅकॅडमी चांदूरबाजार चे संचालक धीरज थोरात, शौर्य फिजिकल करिअर अॅकॅडमी चे संचालक तुषार गतफणे, जिजाऊ प्रशासकीय स्पर्धा परीक्षा अॅकॅडमी चे मुख्य मार्गदर्शक राऊत सहमार्गदर्शक शंकरपाळेसह शेकडो युवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# FDAच्या कारवाईनंतर हॉटेल रोशनीची बॅनरबाजी

### ‘मेकओव्हर’च्या नावाखाली ग्राहकांना संदेश

**विदर्भ प्रजासत्ताकदि.८अमरावती :** २०खाद्यपदार्थ बनविण्याच्या ठिकाणी अस्वच्छता आढळून आल्याने अन्न व औषध प्रशासनाने (FDA) अमरावतीतील प्रसिद्ध हॉटेल रोशनीचा अन्न परवाना काही दिवसांसाठी रद्द केला आहे. या कारवाईनंतर ग्राहकांमध्ये निर्माण झालेली नाराजी आणि हॉटेलच्या प्रतिमेला बसलेला धक्का टाळण्यासाठी आता हॉटेल व्यवस्थापनाने बॅनरबाजीचा आधार




घेतल्याचे दिसून येत आहे.हॉटेलच्या परिसरात लावण्यात आलेल्या पोस्टरवर, ‘हॉटेल रोशनी एक नवीन रूपात लवकरच येत आहे. आम्ही आमच्या जागेला नवीन रूप (मेकओव्हर) देण्यासाठी एक छोटा ब्रेक घेत आहोत. गैरसोयीबद्दल क्षमस्व. आम्ही लवकरच परत येऊ,’ असा संदेश देण्यात आला आहे.मात्र, हॉटेल बंद असण्यामागील नेमके कारण ग्राहकांपासून लपविण्याचा प्रयत्न तर केला जात नाही ना, असा प्रश्न या बॅनरमुळे उपस्थित होत आहे. ऋऊ-च्या तपासणीत खाद्यपदार्थ तयार होणाऱ्या ठिकाणी प्रचंड अस्वच्छता आढळल्याने परवाना निलंबित करण्यात आला आहे हे विशेष.दरम्यान, खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेसोबतच स्वच्छतेच्या नियमांचे पालन करणे हॉटेल व्यवसायासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. ऋऊ-च्या कारवाईनंतर हॉटेल व्यवस्थापनाने स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या नियमांची पूर्तता करूनच पुन्हा व्यवसाय सुरू करणे अपेक्षित आहे. ग्राहकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनाच्या पुढील कारवाईकडे आता लक्ष लागले आहे.

# पार्वती नगर रेल्वे क्रॉसिंगवरील धोकादायक गतिरोधक हटवा

### अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा – नगरसेवक मिलिंद बांबल




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती–**
अमरावती-भातकुली-दर्यापूर या प्रमुख मार्गावरील पार्वती नगर रेल्वे क्रॉसिंग गेट क्रमांक ङउ/३ जवळ रेल्वे विभागाने उभारलेल्या अवाजवी व निकृष्ट दर्जाच्या गतिरोधकांमुळे रोज अपघात घडत असल्याचा गंभीर आरोप भाजपा किसान मोर्चा शहर जिल्हाध्यक्ष मिलिंद बांबल यांनी केला आहे. या धोकादायक गतिरोधकांमुळे दुचाकी व चारचाकी वाहनांचे मोठे नुकसान होत असून प्रवाशांच्या जीवितालाही धोका निर्माण झाला आहे, असे त्यांनी म्हटले आहे.अमरावती शहरातून भातकुली, दर्यापूर तसेच ग्रामीण भागात जाणाऱ्या हजारो नागरिकांसाठी हा अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र रेल्वे क्रॉसिंगजवळ उभारण्यात आलेले उंच व अनियमित गतिरोधक वाहनचालकांसाठी डोकेदुखी ठरत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी किंवा पावसाळ्यात हे गतिरोधक स्पष्ट दिसत नसल्याने वाहनांचा तोल जाऊन अपघात होत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.याशिवाय रेल्वे गेट परिसरात आधीपासूनच मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना वेग कमी करताना आणि गतिरोधक ओलांडताना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेक चारचाकी वाहनांच्या सस्पेन्शनसह इतर भागांचे नुकसान होत असल्याची तक्रारही नागरिकांनी केली आहे.या पार्श्वभूमीवरनगरसेवक मिलिंद बांबल यांच्या नेतृत्वाखाली रेल्वे विभागाकडे निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात विद्यमान धोकादायक गतिरोधक तातडीने हटवून भारतीय रस्ते सुरक्षा नियमांनुसार नवीन व योग्य उंचीचे गतिरोधक उभारावेत, तसेच गेट परिसरातील खड्डे त्वरित बुजवून रस्ता दुरुस्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.नागरिकांच्या सुरक्षेशी खेळ करणारी ही परिस्थिती तात्काळ बदलली पाहिजे. रेल्वे विभागाने त्वरित कारवाई करून धोकादायक गतिरोधक हटवावेत. अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा मिलिंद बांबल यांनी दिला आहे.या मार्गावर दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने संबंधित विभागाने या समस्येची तातडीने दखल घेऊन अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# स्मार्ट मीटरच्या नावाखाली ग्राहकांची आर्थिक कोंडी; तिवसात आंदोलनाचा इशारा..

## अवास्तव वीजबिलांमुळे नागरिक त्रस्त..



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८तिवसा–** तिवसा तालुक्यात महावितरणकडून नागरिकांच्या घरांवर स्मार्ट मीटर बसविण्याचे काम वेगाने सुरू असून, अनेक ठिकाणी ग्राहकांची इच्छा नसतानाही स्मार्ट मीटर बसविले जात असल्याचा आरोप प्रहार जनशक्ती पक्षाचे संजय देशमुख यांनी केला आहे. स्मार्ट मीटर बसविल्यानंतर वापरापेक्षा जास्त व अवास्तव वीजबिले येत असल्याच्या तक्रारी वाढत असल्याने त्यांनी महावितरणच्या कार्यकारी अभियंता, अमरावती यांना सविस्तर निवेदन पाठविले आहे. नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात न आल्यास येत्या १५ दिवसांत तिवसा येथे प्रतीकात्मक स्मार्ट मीटरची होळी करून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, स्मार्ट मीटर बसविल्यानंतर अनेक ग्राहकांना त्यांच्या प्रत्यक्ष वीज वापराच्या तुलनेत अधिक वीजबिले प्राप्त होत आहेत. काही घरांमध्ये वीज वापर अत्यल्प असतानाही हजारो रुपयांची बिले आकारली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी, कष्टकरी आणि मजूर वर्गावर आर्थिक संकट ओढवले असल्याचे देशमुख यांनी म्हटले आहे.

दोष ग्राहकांच्या माथी मारला जात असल्याचा आरोप

अवास्तव वीजबिलाबाबत नागरिकांनी महावितरणच्या उपविभागीय कार्यालयात तक्रार केल्यानंतर घरातील वायरिंग किंवा अर्थिंगमध्ये दोष असल्याचे कारण सांगितले जाते. मात्र, स्मार्ट मीटर बसविण्यापूर्वी घरातील वायरिंग बदलणे किंवा अर्थिंगची तपासणी करून घेणे आवश्यक असल्याबाबत महावितरणकडून ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना देण्यात आली नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. मीटर बसविल्यानंतर निर्माण होणाऱ्या समस्यांची जबाबदारी ग्राहकांवरच ढकलणे अन्यायकारक असल्याचे संजय देशमुख यांनी नमूद केले आहे.

ग्रामीण ग्राहकांची कार्यालयात हेलपाटेग्रामीण भागातील नागरिकांना किरकोळ वीज तक्रारींसाठीही गावातील वायरमन किंवा संबंधित कर्मचारी तालुका कार्यालयात पाठवत असल्याची तक्रार निवेदनातून करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांचा मजुरीचा दिवस वाया जात असून प्रवासाचा खर्चही सहन करावा लागत आहे. अनेकदा वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या मारूनही समस्या सुटत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.महावितरणने स्मार्ट मीटर बसविण्यात दाखविलेली तत्परता नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यातही दाखवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दोषी स्मार्ट मीटरची तातडीने तपासणी करून ते बदलणे, अवास्तव वीजबिले दुरुस्त करणे, ग्राहकांच्या तक्रारींचे गावपातळीवर निराकरण करणे तसेच ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा व ग्राहका भिमुख सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी संजय देशमुख यांनी केली आहे


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वादला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :